परिशिष्ट - २१

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत विंधण विहीर घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु १००४/प्र.क्र.५ /पापु-०७**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२, दिनांक - २० जानेवारी, २००४**

**वाचा :-** शासन निर्णय ,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक-ग्रापापु-१०००/प्र.क्र.१०७(५)/पापु-०७, दिनांक १४ नोव्हेंबर २०००

**प्रस्तावना :-** राज्य शासनाकडील योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्याच्या धोरणास अनुसरुन, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडील विंधण विहीर कार्यक्रम, महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या अधिनियम १९६१, च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. विंधण विहिर कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी घेण्यात येणा-या विंधण विहीरी या ६० मीटर पर्यंत खोल असाव्यात. ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विंधणविहीर घ्यावयाची झल्यास याबाबत सहाय्यक भूवैज्ञानिक यांनी स्वत: तांत्रिक निकष तपासून प्रत्यक्ष क्षेत्रिय अभ्यासावरुन निश्चित करुन अधिक खोलीची विंधण विहीर आवश्यक असल्याचे सूचवून तसा अहवाल संबंधित वरिष्ठ भूवैज्ञानिकांमार्फत उप संचालक भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे यांच्याकडे पाठवावा व उप संचालकांची मान्यता घेऊन अशा विंधण विहीरी घेण्यात याव्यात. अश्या सूचना या विभागाच्या संदर्भिय दिनांक १४.११.२००० च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सविस्तर मार्गदर्शक सूचना मध्ये देण्यात आल्या आहेत.

२. राज्यातील भूगर्भातील पाण्याची पातळी पाण्याचे पुनर्भरण न झाल्याने दिवसेंदिवस खोलवर जात असल्याने, पिण्याच्या पाण्यासाठी घेण्यात येणा-या विंधण विहीरी ६० मीटरपेक्षा अधिक खोलीच्या घेण्याचे प्रमाण बरेच वाढलेले आहे. अशा प्रकारे ६० मीटरपेक्षा जास्त खोलीच्या विंधण विहीरींना यशस्वी होतातच असे नाही. शिवाय, काही ठिकाणी काही प्रमाणात पाणी लागून सुध्दा त्याला वर काढता येत नसल्याने त्याचा उपयोग होत नाही. त्यामुळे, त्या विंधण विहीरीवरील खर्च निरर्थक होतो. यास्तव, पिण्याच्या पाण्यासाठी घेण्यात येण-या विंधण विहीरी ६० मीटर मर्यादेपर्यंतच घेण्याचे बंधन घालण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन **ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी घेण्यात येणा-या विंधण विहिरी या जास्तीत जास्त ६० मीटर खोलीपर्यंतच घेण्यात याव्यात.**

रोटा/एच-1045(2000-01-04)

(कृ.मा.प.

यापुढे कोणत्याही परिस्थितीत ६० मीटरपेक्षा अधिक खोलीच्या विंधण विहिरी घेण्यात येऊ नयेत.

२. सदर आदेशांची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

26/3/

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१५. प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१६. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१७. अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
१८. तहसीलदार (सर्व)
१९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
२०. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२५. गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
२६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
२८. मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई.
२९. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
३०. नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई
३१. वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
३२. ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
३३. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
३४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३५. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

---

\\Ws07a\d\G.R.Folder 03\1004 c.r. 7.1.04.doc

एच-1045(2000-01-04).